# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


*No: CGRF/AZ/AUR/ U / 256 / 2009 /90* *Date :-*

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Shaikh Musa Shaikh Hussain, Tenant Shri Balkrishna Gaikwad, Beed-Bypass Road, Opp: Datta Mandir Deolai Chowk,.Aurangabad. (Consumer No. 490011836701)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Shaikh Musa Shaikh Hussain, Tenant Shri Balkrishna Gaikwad, Beed-Bypass Road, Opp: Datta Mandir Deolai Chowk, Aurangabad.*

The consumer has requested to pass an interim order to reconnect the electricity supply

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 24..11.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:-*

*Shri Shaikh Musa Shaikh Hussain,*
*Tenant Shri Balkrishna Gaikwad,*
Beed-Bypass Road,Opp: Datta Mandir Deolai Chowk,
*Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२५६/२००९/९०

तक्रार दाखल दिनांक :- १७/११/२००९
निकाल दिनांक :- १०/१२/२००९

श्री शेख मुसा शेख हुसैन,
(भाडेकरु) बाळकृष्णा गायकवाड,(व्यवस्थापक),
बीड बायपास रोड, दत्त मंदीर समोर, देवळाई चौक,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११८३६७०१) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | विष्णु अं. हंबिरे | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्य/सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १७/११/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/११/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने वाणिज्य वापरासाठी महावितरण कंपनीकडुन दिनांक ३१/१२/२००७ पासुन विद्युत पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००११८३६७०१ हा आहे.वरील जागा श्री बाळकृष्ण गायकवाड यांनी भाडेतत्वानुसार घेतली असुन तेथील कनेक्शनचा ते ट्रासपोर्ट एजंशीसाठी मागिल १८ महीन्यापासुन वापर करीत आहे. ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन येणा-या देयकाचा नियमीतपणे भरणा केलेला आहे.दिनांक १३/११/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता महावितरणचे कनिष्ठ अभियंता व त्यांचे काही कर्मचारी वरील ग्राहकाचे मीटर तपासणी करीता गेले होते. महावितरणच्या कर्मचा-यांनी ग्राहकाचे मीटर बदली करुन तेथे नविन मीटर बसविले व जुने मीटरच्या चाचणीकरीता त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता महावितरणचे मिल कार्नरच्या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत लेखी पत्र दिले.ग्राहक संध्याकाळी ४.०० वाजेपासुन ७.०० वाजेपर्यत महाविरतणच्या कार्यालयात उपस्थित होते परंतु तेथे संबंधित कर्मचारी कोणीही उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या मीटरची चाचणी झाली नाही. त्यानंतर दिनांक १६/११/२००९ रोजी ग्राहकास महावितरणच्या छावणी कार्यालतुन भा.वि.कायदा २००३ चे कलम १३५ नुसार वीज चोरीबाबत रुपये ३८,९४,७ चे देयक देण्यात आले.वरील देयक ग्राहकास मान्य नसल्यामुळे व ग्राहकाचा विद्युत परवठा बंद असल्यामुळे त्यांनी या मंचात तक्रार दाखल केली आहे.

२)	दिनांक १७/११/२००९ रोजी झालेल्या सुणावणीस वीज ग्राहक श्री सादीक अहेमद, भाडेकरु बाळकृष्ण गायकवाड व नोडल अधिकारी श्री पी.आर.तौर उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी त्यांचा जवाब सादर करतांना सांगीतले की,दिनांक १३/११/२००९ रोजी महावितरणचे छावणी उपविभागाअंतर्गत वीज चोरी बाबत ग्राहकाचे मीटर तपासणी मोहीम घेण्यात आली होती.वरील ग्राहकाच्या मीटरचे निरिक्षण करता त्यांचे मीटरचे सील संशायास्पद वाटल्यावरुन त्यांच्या मीटरची ॲक्युचे मीटरद्वारे तपासणी केली असता त्यांचे मीटर ६९.३ टक्के मंद गतीने फिरत असल्याचे आढळुन आले. महावितरणच्या कर्मचा-यांनी घटनास्थळावर स्थळ निरिक्षण अहवाल तयार करुन ग्राहकाचे मीटर जप्त करण्यात आले व मीटर जप्तीचा पंचनामा तयार करण्यात आला. मीटरला ग्राहक व महावितरणचे कर्मचा-यांच्या सहीने सील करुन मीटर चाचणी करीता ताब्यात घेण्यात आले व ग्राहकास मीटर चाचणी करीता त्याच दिवशी संध्याकाळी उपस्थित राहण्याबाबत लेखी पत्र देण्यात आले.परंतु ग्राहक उपस्थित न राहील्यामुळे ग्राहकाच्या अनुउपस्थितीत दिनांक १४/११/२००९ रोजी सकाळी १०.३० वाजता दोन पंचासमोर मीटरची चाचणी करण्यात आली.सदर चाचणीमध्ये मीटर ७२.६८ टक्के मंद गतीने फिरत असल्यामुळे वरील पंचासमक्ष मीटर उघडण्यात आले.मीटर उघडल्यानंतर मीटरमध्ये लाल रंगाचा फेजवायर डिसकनेक्ट करुन दुस-या ठिकाणी लावलेला आढळुन आला व मीटर सीटीसेकंडरी हीरव्या रंगाच्या वायरद्वारे शॉर्टसर्कीट करण्यात आल्याचे आढळुन आले त्यामुळे वरील प्रकरणाची नोंद भा.वि.वीज कायदा २००३ चे कलम १३५ अंतर्गत घेवुन घटनेचा रिपोर्ट विशेष पोलीस स्टेशन महावितरण कंपनी जालना येथे दिनांक १४/११/२००९ रोजी देण्यात आला.वरील वीज चोरीबाबत ग्राहकास १८,०० युनिट चे अतिरिक्त वीज वापराचे देयक रुपये १८,९४,७ व तडजोडी रक्कम रुपये २०,००,० मीळुन एकुण ३८,९४,७ रुपयाचे वीज देयक देण्यात आले.वरील प्रकरण भा.वि.कायदा २००३ चे कलम १३५ अंतर्गत येत असल्यामुळे मंचाने ग्राहकाची तक्रार खारीस करावी अशी विनंती नोडल अधिकारी यांनी केली.दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

३) मंचासमोर दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, दिनांक १३/११/२००९ रोजी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांनी ग्राहकाचे मीटर ॲक्युचेक मीटर तपसाले असता ते मंद गतीने फिरत असल्याचे अढळ्यावरुन ते मीटर जप्त करुन जप्तीनामा घटस्थळावार तयार करण्यात आला व स्थळ निरिक्षण अहवाल तयार करुन ग्राहकाची स्वाक्षरी घेण्यात आली. मीटरला कर्मचारी व ग्राहकाच्या सहीचे सील लावुन मीटर पुढील तपासणीकरीता महावितरणच्या कार्यालयात आणण्यात आले व ग्राहकास लेखी पत्राद्वारे दिनांक १३/११/२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता उपस्थित राहण्याचे कळविण्यात आले परंतु ग्राहक ठीक वेळेवर उपस्थित न राहील्यामुळे दिनांक १४/११/२००९ रोजी ग्राहकाच्या अनुउपस्थित व बाहेरील दोन पंचाच्या समक्ष मीटर ची चाचणी करण्यात आली त्यामध्ये मीटर ७२.०० टक्के मंद गतीने फिरत असल्याचे आढळुन आले.पंचाच्या समक्ष मीटर उघडुन पाहीले असता त्यामध्ये लालरंगाचा फेज वायर काढुन दुसरीकडे जोडण्यात आल्याचे आढळुन आले व सीटी सेकंडरी हिरव्या रंगाच्या वायरने शॉर्टसर्कीट केल्याचे आढळुन आले.पंचाच्या समक्ष वरील मीटरचा मंचानामा करण्यात आला व प्रकरण वीज चोरीचे असल्यामुळे घटनेचा रिपार्ट महावितरणचे कनिष्ठ अभियंता यांनी विशेष पोलीस निरिक्षक महावितरण पोलीस्टेशन मस्तगड जालना यांना दिनांक १४/११/२००९ रोजी देण्यात आला व ग्राहकास वीज चोरी बाबत रुपये १८,९,४७ व तडजोडीची रक्कम रुपये २०,०,०० असे एकुण रुपये ३८,९,४७ देयक देण्यात आल्याचे आढळुन येते.

४) वरील घटना क्रमांवरुन प्रस्तुत प्रकरण हे वीज चोरीचे असुन महावितरण कंपनीतर्फे नियमाप्रमाणे योग्य कारवाई करण्यात आल्याचे दिसुन येत आहे.महाराष्ट्र नियामक आयोग विनियम २००६ चे कलम ६.८ नुसार वरील प्रकरण अधिनियमाच्या कलम १३५ अंतर्गत येत असल्यामुळे ते मंचाच्या अधिकार क्षेत्रातुन वगळण्यात आले आहे.

# आदेश

ग्राहकाचा अर्ज खारीस करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.**

क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२५६/२००९/९०/ दिनांक :-

प्रति,

श्री शेख मुसा शेख हुसैन,
(भाडेकरु) बाळकृष्णा गायकवाड,(व्यवस्थापक),
बीड बायपास रोड, दत्त मंदीर समोर, देवळाई चौक,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११८३६७०१)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/**२५६/२००९/९०** )

आपण दिनांक १७/११/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.